# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....


साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४ वा ❑ मंगळवार दि.११ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## चिनी एआय नवीन मॉडेल चॅट जीपीटीला खुले आव्हान !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल



**ज्योतिर्मय साहित्य**

२० जानेवारी २०२४ रोजी लाँच झालेल्या चीन-निर्मित डीपसीक एआय मॉडेलच्या नवीनतम आवृत्ती आर १ ने तंत्रज्ञान जगात खळबळ उडवून दिली आहे. आता ओपन सोर्स आणि परवडणाऱ्या पद्धतीने उपलब्ध असलेल्या या एआय मॉडेलबद्दल गुंतवणूकदार आणि तज्ज्ञांमध्ये मोठा उत्साह आहे. डीपसीकने एआय उद्योगात नवीन मानके स्थापित केली आहेत आणि ते ॲपल स्टोअरवर सर्वाधिक डाउनलोड केलेल्या ॲप्सपैकी एक बनले आहे.

डीपसीकचे आर१ मॉडेल देखील व्यवसाय जगतासाठी मोठ्या बदलाचे संकेत देत आहे. सोमवारी (२७ जानेवारी) एनव्हीडियासारख्या चिप उत्पादक कंपन्यांना जवळजवळ ६०० अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले, ज्यामुळे अमेरिकन शेअर बाजारात मोठी घसरण झाली. ही घटना विशेषतः महत्त्वाची आहे कारण अमेरिकेने चीनला प्रगत चिप्स पुरवठ्यावर अनेक निर्बंध लादले आहेत.

डीपसीकचे प्रमुख आकर्षण म्हणजे ते ओपन सोर्स आहे, ज्यामुळे ते इतर एआय मॉडेल्सपेक्षा ९५ टक्के स्वस्त आहे. याचे आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे ते लहान हार्डवेअरवर देखील सहजपणे चालवता येते, ज्यामुळे ते लहान व्यवसाय आणि संशोधकांना देखील उपलब्ध होते. एपीआयची किंमत प्रति दशलक्ष टोकन फक्त ०.५५ आहे, जी ओपन एआय पेक्षा खूपच कमी आहे.

डीपसीकच्या यशामुळे चीनच्या तंत्रज्ञान क्षेत्राला बळकटी मिळाली आहे आणि अमेरिकेच्या एआय तंत्रज्ञानावरील अवलंबित्वाला आव्हान मिळाले आहे. हे मॉडेल अमेरिकन चिप उत्पादक आणि एआय कंपन्यांसाठी एक गंभीर आव्हान ठरू शकते, कारण त्याचे प्रशिक्षण कमी खर्चात शक्य आहे आणि ते उच्च-गुणवत्तेचे निकाल प्रदान करते.


**गुंतवणूकदारांसाठी नवीन संधी**

सध्या, डीपसीक ही खाजगी मालकीची कंपनी आहे, ज्यामुळे ती सामान्य गुंतवणूकदारांना उपलब्ध नाही. परंतु चीन सरकारकडून मिळालेला पाठिंबा आणि डीपसीकने पुरवलेले परवडणारे तंत्रज्ञान पाहता, भविष्यात इतर देशांमधील उद्योजकांसाठीही ते एक नवीन आशेचे किरण बनू शकते.

**डीपसीक अमेरिकेसाठी धोका निर्माण करेल का?**

डीपसीकच्या यशामुळे तंत्रज्ञान जगात, विशेषतः अमेरिकेने चीनवर लादलेल्या निर्बंधांच्या संदर्भात नवीन प्रश्न उपस्थित झाले आहेत. सहज उपलब्ध असलेले हे कमी किमतीचे एआय मॉडेल एआय उद्योगातील पारंपारिक खेळाडूंसाठी धोका निर्माण करेल का ? भविष्यात हा प्रश्न एआयच्या क्षेत्रात चर्चेचा एक महत्त्वाचा विषय बनू शकतो.

## लक्षवेधी छायाचित्र....



The glowing tree, Masai Mara, Kenya

(छाया – संजय दारमवार, मुंबई)

# धाराशिवच्या कालिका कला केंद्राने रोवला मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

## अकलूज राज्यस्तरीय लावणी स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर**

– सहकार महर्षी शंकराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय लावणी स्पर्धेत धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथील कालिका ग्रुप पार्टीने रोख ३ लाख रुपये आणि चषक पटकावून प्रथम येण्याचा मान मिळविला, कालिका ग्रुपच्या प्रमुख निर्मला जाधव आणि संचाने मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यवत (चौफुला) येथील न्यू अंबिका ग्रुप पार्टी आणि सातारा जिल्ह्यातील वेळे येथील पिंजरा कला केंद्राच्या अर्चना वानवडकर आणि संचालाही प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला आहे. आमदार दिलीप सोपल यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. यावेळी स्वरुपाराणी मोहिते आणि जयसिंह मोहिते पाटील उर्फ बाळादादा यांची प्रमुख उपस्थिती होती.



अनिता आष्टीकर, काजल काळे, परवीन शेख, दर्शना वाघमारे, सोनाली गाडेकर, नेहा जाधव, श्वेता अवचार, निकिता खंडागळे, साक्षी कचरे, निकिता मिसाळ, तसलिम शेख, रेखा शिंदे, नितेश जावळे, रणजित लाखे, भानुदास घोसले, विक्की जावळे, राजेंद्र उप्पलवार, गौतम आवाड, लक्ष्मण गंगावणे यांचा संचात समावेश होता.

१ आणि २ फेब्रुवारी २०२५ असे दोन दिवस अकलूजमधील स्मृती भवन, शंकर नगर येथे घेण्यात आलेल्या लावणी स्पर्धेचे हे २८ वे वर्ष होते.

१९९३ पासून ही लावणी स्पर्धा घेण्यात येते. यंदाच्या स्पर्धेत १० संघ सहभागी झाले होते. कालिका ग्रुपच्या निर्मला जाधव यांच्यासह दहा नृत्यांगणा, गायिका प्राजक्ता महामुनी आणि नृत्य दिग्दर्शक महेंद्र बनसोडे यांचा यात समावेश होता.

### स्पर्धेतून प्रोत्साहन मिळते

**आमच्या अथक परिश्रमाला फळ मिळाले. पारंपरिक लावणी ही आपल्या संस्कृतीची ओळख असून, लावणी स्पर्धेचे संयोजक स्वरुपाराणी मोहिते आणि जयसिंह मोहिते उर्फ बाळदादा यांच्या प्रोत्साहनामुळे महाराष्ट्राची लावणी कला सातासमुद्रापार गेली असून, मराठी आणि हिंदी चित्रपटातही अनेक लावणीसम्राज्ञींनी नावलौकिक मिळविला आहे. ही स्पर्धा सातत्याने पुढे चालू ठेवल्यास आमच्या सारख्या कलावंतांना बळ मिळेल.**



**– निर्मला जाधव,**
पार्टीप्रमुख


### सविस्तर निकाल

**प्रथम क्रमांक : न्यू अंबिका ग्रुप पार्टी (चौफुला यवत), अर्चना वानवडकर पिंजरा (वेळे) आणि कालिका ग्रुप पार्टी (चोराखळी), द्वितीय क्रमांक शीतल पूजा भूमकर, जय अंबिका (सणसवाडी), अनिता परभणीकर, नटरंग (मोडनिंब), तृतीय क्रमांक : प्रिती परळीकर, न्यू अंबिका (चौफुला यवत), चतुर्थ क्रमांक : सुनीता श्यामल लखनगांवकर, नटरंग, (मोडनिंब), उत्कृष्ट लावणी अदाकारी कलावंत : प्रिती फरळीकर, उत्कृष्ट तबला वादक निलेश डावाळे, उत्कृष्ट ढोलकी वादक : अर्जुन शिंदे, उत्कृष्ट गायिका : कल्याणी गायकवाड, उत्कृष्ट हर्मो नियम वादक : विकी जावळे, उत्कृष्ट मुजरा : प्रिती परळीकर, न्यू अंबिका यवत (चौफुला)**

## सौ.सुनिता दिपक कावसनकर या दिल्ली येथे ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनासाठी निमंत्रित

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर**

– छत्रपती संभाजीनगर येथील प्रख्यात कवयित्री, लेखिका, संपादिका व प्रकाशिका सौ.सुनिता दिपक कावसनकर या दिल्ली येथे ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनासाठी स्त्री भ्रूण हत्या या त्यांच्या कवितेची निवड झाली असून कविकट्टा या काव्यमंचावर त्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. ९७ व्या अमळनेर येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात पण त्यांना निमंत्रितांमध्ये स्थान मिळाले होते.



सौ. सुनिता दिपक कावसनकर या कवयित्री, लेखिका, युगंधर साप्ताहिकाच्या संपादिका, युगंधरा साप्ताहिक,युगंधरा प्रकाशन संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा तसेच युगंधरा मराठी साहित्य व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या व्यवस्थापकीय संचालिका व संस्थापिका आहेत..

छत्रपती संभाजीनगरमधे नूकतेच १५ डिसेंबर २०२४ रोजी युगंधरा मराठी साहित्य व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने भव्यदिव्य असे साहित्य संमेलन त्यांनी भरवले होते. जे संमेलनाच्या आगळ्यावेगळ्या नियोजनाने व २१ पुस्तकांच्या प्रकाशनाने खूप गाजले. सौ.सुनिता कावसनकर या नवसाहित्यिकांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी काढलेला युगंधरा दीपोत्सव विशेषांकाला पुणे येथील मधूरंग संस्थेचा पुरस्कारही प्राप्त झाला आहे. सतत साहित्यिकांसाठी भरपूर उपक्रम त्या राबवितात. त्यांच्या प्रेमळ व विनम्र स्वभावाने त्या साहित्यिकांच्या खूप लाडक्या आहेत.

त्यांचा काव्यशारदा हा काव्यसग्रह वैविध्यपूर्ण कवितांनी नटलेला आहे.. आध्यात्मिक, सामाजिक, नारीशक्ती जलसंपदा, योगा, इत्यादी विषयांवर त्यात काव्यमय भाष्य केलेले आहे. तसेच त्यांचा शारदांगण हा खूप आगळावेगळा काव्यसंग्रह असून यात त्यांच्या शाळेच्या मैत्रिणींच्या वाढदिवसाच्या कविता आहेत..

काव्यमोती, काव्यस्पर्श व काव्यरत्न, या त्यांच्या कविता समाविष्ट असलेले काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. तसेच राजा पंढरीचा, निर्धार मनाचा, रेशीमबंध काव्यसंग्रह, गुरुपौर्णिमा काव्यसंग्रह व काव्यबंध रक्षाबंधन काव्यसंग्रह हे त्यांचे प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

आत्तापर्यंत अनेक दिवाळी अंकात त्यांचे साहित्य प्रकाशित झाले आहे. आत्तापर्यंत त्यांना विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहेत त्यात –

१) राज्यस्तरीय साहित्य रत्न पुरस्कार, २) राज्यस्तरीय साहित्य प्रेरणा गौरव पुरस्कार, ३) राज्यस्तरीय दर्पण काव्यप्रतिभा पुरस्कारा,४) दर्पण आयकॉन पुरस्कार, ५) राष्ट्रीय बंधूता शब्दक्रांती साहित्य पुरस्कार, ६) कोल्हापुर येथे राज्यस्तरीय साहीत्य साधना प्रेरणा पुरस्कार, ७)अखिल भारतीय साहित्य मंच मुंबई येथे राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ साहित्यरत्न पुरस्कार, ८)नाशिक येथे साहित्य व पत्रकारीता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी *वुमन्स स्टार रायसिंग अवॉर्डने सन्मानित, ९)साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार शिर्डी येथे, १०) बंधूता मायमराठी साहित्य पुरस्कार पुणे, ११)तितिक्षा साहित्यश्री पुरस्कार सन्मानित कोल्हापुर,१२)राजयुवा कविता संगह पुरस्कार शारदांगण २०२४ प्राप्त, १३)तितिक्षा आंतरराष्ट्रीय शब्द कोहिनूर पुरस्कार, १४)वर्ल्ड पोएट्री संस्थेतर्फे वर्ल्ड पोएट्री अवार्ड २०२४ हा अवार्ड, १५) तितिक्षा साहित्यश्री पुरस्कार,१६) मधुरंग संस्थेतर्फे इंटरनॅशनल डायमंड ॲवार्ड, १७)नेताजी स्मृती पुरस्कार,१८) सावित्रीबाई फुले लाईफटाईम अचिव्हमेंट अवार्ड असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

## एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार

### शरद पवारांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली** – राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. येत्या मंगळवारी (११ फेब्रुवारी) दिल्लीत माजी केंद्रीय मंत्री आणि दिल्लीत होत असलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.५ लक्ष रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह आणि शिंदेशाही पगडी असे पुरस्काराचे स्वरुप आहे.केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, जेष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आणि पद्मभूषण राम सुतार यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील. नवी दिल्ली येथे एका कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



सरहद, पुणे आयोजित अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित याच कार्यक्रमात दिल्लीत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा गौरव केला जाणार आहे, अशी माहिती, सचिन ईटकर, वैभव डांगेआणि लेशपाल जवळगे यांनी दिली.

कार्यक्रमाच्या पूर्वी मराठी अभंगांसाठी प्रसिद्ध सरहद च्या शमिमा अख्तर यांच्या अभंग गायनाचा तसेच मराठी गीत गायनाचा कार्यक्रम असणार आहे.






– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...

## अंतर्मन हे प्रेमाचे प्रतिबिंब असावे

ज्योतिर्मय साहित्य

प्रेमाची परिभाषा समजण्यासाठी अगोदर त्या प्रेमाची अनुभूती घ्यावी लागत असते. प्रेम दिल्याशिवाय ते मिळतंच असं नाही. अनेकदा ते मिळत नाही म्हणून दिलंही जात नाही. प्रेमामध्ये त्याग महत्वाचा असतो, तोच अनेकदा नको असतो. प्रेम हे काही केवळ एक स्त्री-पुरुष ह्यांच्या परस्परांतील असतं असं नाही. आपलं अंतर्मन हे खरं तर प्रेमाचं प्रतिबिंब असावं, त्या प्रतिबिंबित छबीदार रूपांत दडलेल्या प्रेमाचा साक्षात्कार व्हावा लागतो. प्रेमाची परिभाषा आर्थिक प्रमेयाशी जोडली जात असल्याचं खेदजनक चित्र अनेक ठिकाणी आपल्याला दिसत असतं. प्रेमामध्ये शब्दांपेक्षा भाव-भावनाच अधिक महत्वाच्या असतात. निस्वार्थी प्रेमाची जाणीव असणं जरुरीचं असतं.

जीवनाचं खरं सार आपण दुसऱ्यांना, इतरांना देत असलेल्या आणि आपल्याला मिळत असलेल्या प्रेमांत सामावलेलं असतं. प्रेमासाठी तन अथवा धन नाही तर मन महत्वाचं असतं, ह्याची जाणीव सतत ठेवणं जरुरीचं असतं. प्रेमाच्या प्रप्तीचीच अनेकदा उणिव असल्याचं दिसतं, त्यामुळेच समूहामध्ये, घोळक्यात, गर्दीत देखील एखादी व्यक्ती स्वतःला एकटं समजत असते. त्याउलट प्रेमाचा वर्षाव होत असलेल्या व्यक्तीला एकटे असताना देखील मानसिक एकलेपण जाणवत नाही. तेच खरं जीवनातलं सार आहे. सुखाचा संबंध अनेकदा शरीराशी जोडला जात असतो. सुखद अनुभवांची आश्वासकता ही मनाला देखील जरुरीची असतेच. परंतू शारीरिक पातळीवर सुखी होण्याची केविलवाणी धडपड आपण दिवसरात्र करत असतो. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आपण सुख मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला अपेक्षित सुख मिळेपर्यंत आपली धडपड सुरुच असते.

## खरोखरच आपण सुखी आहोत का?


ज्योतिर्मय साहित्य

खरोखरच आपण सुखी आहोत का असा प्रश्न जेव्हा आपण स्वतःला विचारतो, तेव्हा खरं तर आपण त्याबद्दल साशंक असतो. मानवी जीवनात सुख आणि दुःख यांचा पाठशिवणीचा खेळ सुरूच असतो. कधी कधी तर एका डोळ्यात आसू आणि एका डोळ्यात हसू अशीही परिस्थिती असते. पण परिस्थिती कशीही असली तरी आनंदी राहणे, समाधानी राहणे आपल्याच हातात असते. सुख आणि दुःख हे बाहेरील घटनांवर जरी अवलंबून असले तरी सुख आणि दुःख या आपल्या मनाच्या अवस्था आहेत. सुख आणि दुःख या गोष्टी सापेक्ष आहेत. एका व्यक्तीला ज्या परिस्थितीत सुख वाटेल, त्यात दुसऱ्याला वाटेलच असे नाही. उदाहरण सांगायचं झालं तर मला प्रवास आवडतो, गाणी ऐकायला आवडतात. पण सगळ्यांना या गोष्टी आवडतीलच असे नाही.

पण आपण सुखी आहोत का यापेक्षा आपण समाधानी आहोत का असा प्रश्न खरं तर आपण स्वतःला विचारायला हवा. कारण आपल्या सुखाच्या कल्पना याच बहुधा आपल्याला त्रासदायक ठरतात. सुखाचा पाठलाग कधीच संपत नाही. पण समाधान मात्र कोणत्याही परिस्थितीत मिळू शकते. आज सायकल ही माझी गरज आहे. ती मिळाली की मी आनंदी होईन असे मला वाटते. मला सायकल मिळते. पण मग माझी सुखाची कल्पना तिथेच थांबत नाही. मला मग हवी असते मोटारसायकल, ती मिळाल्यावर मला कार हवी असते. घर झाले की मोठे घर हवे असते, आवश्यक तेवढा पैसे जवळ असले तरी अजून हवे असतातच. एकूण काय सुखाचा शोध कधी संपत नाही. पण आपण ठरवलं तर समाधान मात्र प्रत्येक अवस्थेत राहू शकतं.



मला या ठिकाणी एक वाचलेली गोष्ट आठवते आहे. एक शेतकरी असतो. जमिनीचा छोटासा तुकडा त्याच्याजवळ असतो. त्यातच मोठ्या कष्टाने तो शेती पिकवतो. आनंदी आणि समाधानी राहतो. एकदा शहरातून एक श्रीमंत व्यक्ती त्या गावात येते. त्या व्यक्तीला गावात कसला तरी कारखाना काढायचा असतो. त्याला त्या शेतकऱ्याची




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

जमीन हवी असते. तो ज्यावेळी शेतकऱ्याला भेटायला जातो, तेव्हा तो शेतकरी आपल्या शेतातील एका झाडाच्या सावलीत आरामात पहुडलेला असतो. मुखाने परमेश्वराचे नामस्मरण सुरु असते. तो श्रीमंत माणूस त्याच्याजवळ जाऊन त्याला म्हणतो, अरे, तू ही जमीन मला विकून टाक. मी तुला भरपूर पैसे देतो. शेतकरी विचारतो, भरपूर पैसे मिळाले म्हणजे काय होईल ?


श्रीमंत माणूस म्हणतो, अरे वेडा आहेस का ? तुझ्याकडे भरपूर पैसे आल्यावर तू श्रीमंत होशील. शेतकरी विचारतो, श्रीमंत झाल्यावर काय होईल ?

अरे वेड्या, तुला हवे ते घेता येईल. अजून दुसरी शेती तू घेऊ शकतो, बंगला बांधू शकतो. नोकरचाकर सेवेला ठेवू शकतो. तो माणूस म्हणाला.

बरं, मग तसं झाल्यावर काय होईल ? शेतकरी विचारतो.

अरे वेड्या, तू सुखी आणि समाधानी राहू शकशील, तुला भरपूर निवांत वेळ मिळेल. आपल्या मुलाबाळांमध्ये आनंदाने राहता येईल, श्रीमंत माणूस म्हणाला.

शेतकरी म्हणाला, मग त्यासाठी मला शेतीच कशाला विकायला हवी ? आणखी पैसा कशाला हवा ? कारण सुखी आणि समाधानी मी आताही आहेच. आताही माझ्याकडे निवांत वेळ आहेच. आणि माझ्या मुलाबाळांसाठीच तर मी हे सगळे करतो. आम्ही सगळे आहे त्यात मजेत जगतो. त्या सामान्य शेतकऱ्याला सुख कशात आहे हे बरोबर कळले होते म्हणून आपल्या छोटयाशा जमिनीच्या तुकड्यावर तो समाधानी होता. **(क्रमशः)**






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## नरदेहस्तवन (समास दहावा)

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)**

कुरवपूरहून श्रीपाद श्रीवल्लभ पुढे उत्तर भारतात तीर्थयात्रेला गेले. आपल्या भ्रमणात त्यांनी बनारस, जगन्नाथपुरी, बद्रीनाथ, केदारनाथ आदी तीर्थक्षेत्री जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर उत्तर भारताची तीर्थयात्रा त्यांनी आरंभ केली. काही वर्षे त्यांनी गोकर्ण-महाबळेश्वर या क्षेत्री निवास केला. त्यानंतर ते पुन्हा एकदा कुरवपूरला आले आणि आपल्या अवतारसमाप्तीपर्यंत तिथेच राहून आपले कार्य पूर्ण केले.

या दरम्यान एक प्रसंग घडला. श्रीपाद श्रीवल्लभ हे कृष्णातीरावर सहज फिरत असताना एका स्त्रीला आपल्या मुलासह नदीत आत्महत्या करताना त्यांनी पाहिले. त्या स्त्रीला त्यांनी थांबवले आणि तिला विचारले, माई, हा अविचार आपण का करत आहात ?

तेव्हा ती स्त्री म्हणाली, महाराज, मी किती अभागी आहे. हा माझा मुलगा मंदबुद्धी आहे. त्याच्यामुळे मला अपमान सहन करावा लागतो. त्याला व्यवहारज्ञान किंवा कोणतेही ज्ञान नाही. कसे वागावे ते कळत नाही. त्यामुळे माझ्यासमोर आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय नाही. स्वामी म्हणाले, माई, हा नरदेह मोठया भाग्याने मिळतो. आत्महत्या करणं हे सर्वात मोठं पाप आहे. मग मी काय करू ? हा मुलगा शहाणा आणि ज्ञानी होईल असा काही उपाय आहे का ? माई, मी तुला एक व्रत सांगतो. त्यामुळे तुझा मुलगा सुधारेल, ज्ञानी होईल. शनिवारी त्रयोदशी असेल त्या दिवशी म्हणजे शनिप्रदोषाच्या दिवशी तू शंकरांची पूजा कर. पण तुझ्या मनात ज्या पुत्राची इच्छा आहे, तसा पुत्र तुला पुढील जन्मी प्राप्त होईल. त्या स्त्रीने ते व्रत कसे करायचे ते समजून घेतले. व्रत आचरणाला सुरुवात केली. हळूहळू मुलामध्ये फरक पडू लागला. आता तो अभ्यासात प्रगती करू लागला. पुढे ज्ञानी झाला. मात्र स्वामींसारखा पुत्र आपल्याला असावा ही तिच्या मनीची आस होती. मनोमन ती स्वामींची भक्ती करत होती. श्रीपाद श्रीवल्लभांनी कालांतराने श्री नृसिंह सरस्वती म्हणून त्या स्त्रीच्या पोटी अवतार घेतला आणि तिची इच्छा पूर्ण केली. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## भगवंत हा प्रपंचासाठी साधन बनवू नये

ज्योतिर्मय साहित्य

एक मुलगा घरातून पळून गेला. तेव्हां त्याची आई म्हणाली, तो कुठेही राहू दे, पण खुशाल असू दे. तसे, तुम्ही कुठेही राहा पण नामात असा. नाम तेवढे बळजबरीने घ्या. श्रद्धेने घेतले तर जास्त बरे; वृत्ती सांभाळून नामात राहिलात तर त्याहूनही जास्त बरे ! वनस्पतीच्या पाल्याचा रस काढण्यासाठी काही पाल्यांमध्ये मध घालावा लागतो, काहीमध्ये दूध, तूप किंवा पाणी घालावे लागते. तसे भगवंताचे प्रेम लाभण्यासाठी आणि नामात गोडी उत्पन्न होण्यासाठी, त्या नामामध्ये थोडी श्रद्धा घाला. मी ब्रह्म आहे या अनुभवातसुद्धा मीपणा आहे. नाम त्याच्याही पलीकडे आहे. म्हणून भगवंताच्या नामाचे सतत स्मरण ठेवावे; त्यामुळे प्रपंच सोपा होतो. नामाची सत्ता फार बलवत्तर आहे. जगात असे कोणतेही पाप नाही की जे नामासमोर राहू शकेल. नाम हे त्याच्या शत्रूलाही मदत करते, तर ते आपल्याला मदत करीलच. रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. सत्याला काही रूप दिल्याशिवाय आज आपल्याला त्याचे अनुसंधान ठेवता येत नाही. नाम हे त्याचे रूप आहे, म्हणून नामाचे सतत अनुसंधान ठेवावे. भगवंताच्या नामात मोबदल्याची अपेक्षा नाही, म्हणून ते अपूर्ण नाही. अडाणी लोकांना नाम घ्यायला सांगितले तर ते लगेच घेणे चालू करतात, परंतु विद्वान लोक मात्र नामाचे प्रेम असेल तरच मी नाम घेईन असे म्हणतात. विषयरूपी सापाचे विष उतरलेले नसल्याने भगवंताचे अमृतासारखे गोड नाम आपल्याला गोड लागत नाही. याकरिता या क्षणापासून नाम घ्यायला सुरुवात करावी. आपण रामाचे व्हावे आणि त्याला जे आवडते ते करावे. रामाला जाणतेपणाने शरण न जाता नेणतेपणाने शरण जावे. भगवंताला अनन्य शरण जाऊन अनुभव घ्यावा. नीतीने वागावे, भक्ती चांगली करावी, मग राम प्रसन्न होतो.

ज्ञान श्रेष्ठ खरे, पण ते भक्तीशिवाय जगू शकत नाही; कारण भगवंताहून कधी विभक्त नसतो तो भक्त होय, आणि ज्ञानामध्ये भगवंताशी एकरूपत्व असते; म्हणून भक्तीमधून ज्ञान उत्पन्न होते आणि ते भक्तीवरच जगते. खरा भक्त ज्ञानीच असतो. भगवंतासाठी भगवंत पाहिजे म्हणून भक्ती करणारा लाखांमध्ये एखादाच असतो. खरी भक्ती ती हीच समजावी. नामाकरिता आपण नाम घ्यावे, राम ठेवील त्यात समाधान मानावे. भगवंत हा प्रपंचासाठी साधन बनवू नये, तो साध्य असावा. ज्याने भगवंताच्या नामात आपल्या आयुष्याचा व्यय केला, त्याने जन्माला येऊन सर्व साधले आणि जन्माचे सार्थक करून घेतले.

ज्ञानी होऊन नामस्मरण करणे, किंवा भक्त होऊन नामस्मरण करणे, एकच आहे. दोन्हीकडे भगवत्प्रेम मुख्य आहे.

***






विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७



## स्वच्छतादूतः झोप

ज्योतिर्मय साहित्य

आज काही केल्या कामात लक्ष लागत नव्हते. कंटाळा येत होता. असे का व्हावे? याचे कारण शोधताना ( इतरत्र नाही. बरीच कारणे स्वसंवाद केला की सापडतात. ही माझी नेहमीची सवय आहे. आणि आपण स्वतःला कधीच फसवू शकत नाही. त्या मुळे खरी कारणे सापडतात.) असे लक्षात आले, की रात्री आपली झोप नीट झाली नाही. मग झोपेचे इतके महत्व असते का? हा प्रश्न पडला. आणि झोपेचे महत्व शोधण्याच्या मागे लागले. सध्या डॉ. विचारवंत, अभासू यांच्या बरोबर गुगलबाबा हे एक माहितीचे साधन सापडले आहे. मग सगळीकडून माहिती मिळवताना बरीच महत्वाची माहिती मिळाली. आणि मग काय ! माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे ‘‘जे जे आपणासी ठावे....‘‘ या उक्ती प्रमाणे लिहून काढले.

सर्वांनाच झोप आवश्यक असते. गाढ झोप झाली की आपल्याला ताजेतवाने वाटते. अगदी घर स्वच्छ केल्यावर जसे प्रसन्न वाटते, तसेच वाटते. आपण विश्रांती घेत असताना आपले काही अवयव विश्रांती घेतात. पण काही अवयव कायम काम करीत असतात. त्यांनी विश्रांती घेतली, तर आपल्याला कायमची विश्रांती मिळेल. तर यात मेंदू सुद्धा चोवीस तास कार्यरत असतो. मग तो अविरत काम करुन थकत नसेल का? याला आपले काम करण्यासाठी निवांत वेळ मिळतो ते आपण झोपू त्या वेळी. शांत व गाढ झोप काय करते? तर अशा झोपण्यामुळे शरीरातील दूषित व नको असलेले पदार्थ अर्थात विचार आणि आठवणी हे बाहेर टाकले जातात. व मेंदूची झालेली झीज भरून काढली जाते.

आपल्या झोपेच्या चार पायऱ्या असतात. या तेव्हाच काम करतात जेव्हा आपल्याला गाढ व शांत झोप लागते.

पहिली पायरी म्हणजे ‘‘पेंगुळलेली अवस्था‘‘ यात आपण पूर्ण झोपलेले नसतो. पण पूर्ण जागेही नसतो. या अवस्थेत मेंदूतून थिटा वेव्हस बाहेर पडत असतात. **(क्रमशः)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**अधिगतपरमार्थान् पण्डितान् माऽवमंस्थास्**
**तृणमिव लघु लक्ष्मीर्नैव तान् संरुणद्धि।**
**अभिनवमदलेखाश्यामगण्डस्थलानां**
**न भवति बिसतन्तुर्वारणं वारणानाम्।।**

अर्थ – परमार्थ तत्त्वाच्या जाणकारांना सन्मानित करावे, पुरस्कृत करावे. ते धनास तृणवत् म्हणजे गवतासमान मानतात. त्यामुळे धन त्यांना वश करू शकत नाही. जसे कमलदंडाच्या तंतूने मदधारायुक्त गंडस्थल असणा-या हत्तीला अडवता येत नाही, बांधता येत नाही.

ज्यांनी परमार्थ तत्त्व जाणले आहे, ज्यांना त्या परम तत्त्वाचा अवबोध झाला आहे, अशा लोकांना अर्थ म्हणजे वित्ताचे महत्व वाटत नसते. वित्तेषणा म्हणजे धनाची लालसा त्यांना नसते. त्यामुळे त्यांना धनाने वश करता येत नाही. तथापि आपण त्यांचा मानसन्मान करावा, हे आपल्यासाठी कल्याणप्रद असते.




## तीळाचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

तीळ मजबुत हाडांसाठी. तीळात कॅल्शियम आहे, ते आपल्या सर्वांना माहीतच आहे. याशिवाय मॅंगनीज, लोह, फॉस्फरस, सेलेनियम, ब गटातील जीवनसत्त्वे आणि तंतुमय पदार्थही आहेत. तीळातील कॅल्शियम हाडांसाठी चांगलं तर आहेच, तसेच तीळात झिंक जास्त असते, जे हाडांचा ठिसूळपणा रोखण्यास मदत करते. थोडक्यातच स्त्रियांना याचा खूप फायदा होऊ शकतो. तीळातील कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरससारखे घटक हाडांसाठी पोषक ठरतात. थंडीच्या दिवसात तीळ खाण्याची सवय ठेवल्यास हाडं किंवा सांधेदुखीचा त्रास जाणवणार नाही. दिवसातून एकदा तुम्ही मोठा चमचाभर तीळ खाल्लेत, तर तुमचे दातही मजबूत होतील. तिळात फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स उच्च प्रमाणात असल्यामुळे रोग प्रतिकारशक्तीही वाढते. हिवाळा स्वास्थासाठी चांगला मानला जातो. थंडीच्या दिवसांत अशा काही गोष्टी मिळतात ज्या आपल्या शरीरासाठी फायदेशीर मानल्या जातात. त्यापैकीच एक म्हणजे तीळ. तीळ एक असा खाद्यपदार्थ आहे, ज्यात अनेक गुणकारी घटक असतात. दिसायला अतिशय छोटा असणाऱ्या तीळाचे मोठे फायदे आहेत.



थंडीत तीळाचं सेवन शरीरासाठी उत्तम मानलं जातं. तीळामुळे शरीराला उष्णता मिळण्यास मदत होते. तर आपल्या शरीराची हाडंदेखील मजबूत करते. वैज्ञानिकदृष्ट्या तीळाच्या तेलामध्ये केसांसाठी पोषक घटक असल्याचं सांगण्यात आलं आहे. तीळाच्या तेलात व्हिटॅमिन ई, बी कॉम्प्लेक्स, कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि प्रोटीनही मूबलक प्रमाणात आढळतं.

तीळात सेसमीन नावाचे एन्टीऑक्सिडेन्ट आढळतात जे कॅन्सर पेशी वाढण्यापासून बचाव करतात.

तीळाच्या सेवनामुळे भूक वाढते. तीळ वात, पित्त आणि कफची समस्या कमी करण्यास मदत करते.

तीळाच्या तेलाने सतत मालिश केल्याने हाडं मजबूत होण्यास मदत होते.

थंडीच्या दिवसांत तीळाचं तेल त्वचेवर लावल्याने त्वचेवरील रखरखीतपणा दूर होतो. तीळाच्या सेवनाने चेहरा चमकदार होण्यास मदत होते.

पोटात दुखत असल्यास काळे तीळ गरम पाण्यासोबत खाल्ल्याने पोटदुखीपासून आराम मिळतो.

तीळामध्ये असणाऱ्या काही घटकांमुळे तणाव, डिप्रेशनच्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत मिळू शकते.

तीळ आणि खडीसाखर एकत्र खाल्ल्याने सुक्या खोकल्यापासून आराम मिळू शकतो.


कान दुखत असल्यास तीळाच्या तेलात लसून एकत्र करुन, तेल हलकं गरम करुन लावल्यास कानदुखी कमी होऊ शकते.

तीळाचं सेवन दातांसाठीही गुणकारी ठरतं. सकाळी ब्रश केल्यानंतर तीळ चावून खाल्ल्याने दात मजबूत होण्यास फायदा होतो.

सतत तोंड येत असल्यास तीळाच्या तेलात सेंधव मीठ मिसळून लावल्यास आराम पडू शकतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ।। श्री स्वामी समर्थ ।।





ज्योतिर्मय साहित्य

स्वामी म्हणतात – भरवसा आणि आशिर्वाद कधी दिसत नाहीत, परंतु अशक्य गोष्टीलाही ते शक्य करतात. समोरचा समजून घेणारच नसेल तर आपलं सांगणं आणि त्याचं ऐकणं दोन्हीही व्यर्थ आहे. समोरची व्यक्ती आपल्यावर विश्वास ठेवतो हिच आपल्या जीवनातील सर्वात मोठी सफलता असते.

स्वामी म्हणतात – जेव्हा माणसाची योग्यता व हेतूचा प्रामाणिकपणा सिद्ध होतो, तेव्हा त्याचे शत्रूदेखील त्याचा सन्मान करू लागतात, प्रेम करणारी माणसं या जगात खूप भेटतात, पण समजून घेणारी आणि समजून सांगणारी व्यक्ती भेटायला भाग्य लागते

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

रामायण, महाभारताच्या काळात आपल्या देशात शिक्षणासाठी तपोवन किंवा आश्रम पद्धती अस्तित्वात होती. गुरु आपल्या शिष्यांना निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षण देत असत. प्राचीन काळातील ऋषीमुनी चिंतन, मनन आणि तपसाधनेतून ज्ञान प्राप्त करीत. त्यातून प्राप्त झालेले ज्ञान आपल्या शिष्यांना सहजपणे देता यावे, देशहित आणि समाजहित साधतील असे उत्तम नागरिक त्यातून घडावेत असा त्यांचा उदात्त हेतू होता. हे ऋषीमुनी काही जीवनाला कंटाळून अरण्यात पळून गेलेले नव्हते. त्यांच्यासाठी निसर्गातील पंचमहाभूते म्हणजे खळाळणारे ईश्वरी चैतन्य होते. याच चैतन्याची अनुभूती त्यांना आपल्या शिष्यांना द्यायची होती. केवळ शिक्षणच नव्हे तर एकूणच त्यांचे जीवन जगणे आनंदी करायचे होते. या उदात्त हेतून आश्रमांची स्थापना त्यांनी केली होती.

रवींद्रनाथांना केवळ आश्रम किंवा तपोवनांची पुनर्निर्मिती करायची नव्हती. जुन्या रूढींचं आंधळेपणाने अनुकरण करणाऱ्यातलेही ते नव्हते. मानव ज्या निसर्गाचा एक भाग आहे, त्या निसर्गाच्या सहवासात मुलांचं व्यक्तिमत्व फुलून यावं, त्यांच्या तरल मानवी संवेदना जाग्या व्हाव्यात हा त्यांचा उद्देश होता. शेक्सपिअर, गटे, होमर आदी कवींच्या काव्यात निसर्ग येतो पण निसर्गाची जी सखोल जाणीव आणि अनुभूती कालिदास, भास, भवभूती आदींची नाटके वाचताना येते, वेद, उपनिषदात त्यांचे जे वर्णन येते तसे ते पाश्चात्य साहित्यात अनुभवास येत नाहीत. आपल्या मुलांना आपल्या भाषेतच शिक्षण द्यावे, येथील काव्य, लोकसाहित्य आदींशी त्यांचा परिचय करून द्यावा असं त्यांना वाटत होतं. आमार जीवन, आमार बानी असं ते म्हणत त्याचा अर्थ हाच होता.

कालिदासाच्या तपोवनातलं एक सुदंर उदाहरण ते आपल्या तपोवन या निबंधात देतात. ते म्हणतात, शकुंतला आणि तिच्या सख्या आश्रमातील झाडांना पाणी घालत असत. झाडाभोवतीचे आळ भरलं की त्या लांब निघून जात. त्या लांब निघून गेल्यावर पक्षी येऊन ते आळ्यातील पाणी पीत असत. म्हणजे पाणी देताना केवळ झाडांचाच विचार त्या करीत नव्हत्या तर सभोवतालचे प्राणी, पशुपक्षी आदींचाही विचार त्यामागे होता. असा दुसऱ्यांच्या जगण्याचा, कल्याणाचा विचार तपोवनातील शिक्षणामागे होता. **(क्रमश:)**

# माकडे... आणि आठवण प्रवास..

आमच्या बिल्डिंगच्या अगदी समोर भरगच्च आंब्याचे झाड होते..(मागच्या वर्षी ते जळाले..) तसेच समोर गुलमोहर, नारळ आणि इतर हिरवाई भरपूर.. त्यामुळे एकूणच भरपूर पक्षांचा सहज वावर बघायला मिळतो.. त्याच बरोबर सातत्याने माकडांची टोळी अधून मधून आपल्या पोरा बाळांना घेऊन येते.. मग काय त्यांचा दंगा, बाळांना पोटाशी घेऊन उड्या मारणे आणि आमच्या टेरेसवर आणि एकूणच पूर्ण बिल्डिंग मध्ये येऊन सर्व प्रकारचा त्यांचा गोंधळ घालणे सुरूच असते..

लग्नानंतर सुरुवातीला ही माकडे बघून मला खूप गंमत वाटायची आणि त्यांची दया पण खूप यायची.. मग मी त्यांना एखादे केळ, शेंगा असे काहीतरी खायला टेरेसवर पटकन टाकून येत असे. पण एकेदिवशी दुपारी दार वाजले तर दारात माकडे. आश्चर्य आणि भीती मला वाटलीच.. पण हे शेजारणीने बघितले



आणि मला रागात समज दिली तू त्यांना सवय लावू नकोस माधुरी.. बघ आज सरळ ते दारात आलेत..


मला जरी हे पटले आणि मी खाणे देणे बंद केले तरी त्यांचा मुक्त संचार चालूच असतो, त्यांची धाड पडलेली समजली तर खिडकी, दारे आम्हीं बंद करून घेतो..पण कधी कधी आपल्या कामाच्या व्यापात लक्षात आले नाही तर गोंधळ होतो..मी रोज दुपारी साधारण १२ वाजता कावळ्याला टेरेसवर दही भात ठेवते..एके दिवशी अशीच मी सकाळच्या घाईत भात ठेवण्यासाठी वर जात होते तर वर बसलेल्या वानराने एकदम माझ्या अंगावर झेप घेतली.. ते वर शांत बसले होते तिकडे माझे लक्षच नव्हते.. त्यामुळे मी घाबरून ओरडले आणि धडपडून पडले.. योगायोगाने समोरच्या खोलीत मुलगा (वर्क फ्रॉम होम) काम करत होता.. तो पळत आला.. मला थोडे लागले पण माकडा बद्दलची भीती मात्र वाढली.

अशाच एका संध्याकाळी मी घरी एकटीच होते.. पालेभाजी, कोथिंबीर निवडत मी स्पीकरवर फोन टाकून मैत्रिणीशी बोलण्यात गुंतले होते अचानक मला जाणवले की समोर कोण तरी आहे. बघितले तर अगदी माझ्यासमोर एक माकड बसले होते. मी किंचाळतच बाहेर पळाले. शेजारणीचा मुलगा माझा आवाज ऐकत पळत आला.. माकड गेले पण कितीवेळ मी थरथरत होते..

अलीकडेच अष्टविनायक यात्रेतील लेण्याद्रीवर माकड टोळ्या अगदी हुंदडत होत्या.. तीनशे पासष्ट पायऱ्या चढताना अगदी दमायला झाले होते.. प्रचंड गर्दी, काही लोकांना वर घेऊन जाणाऱ्या डोल्या, आणि त्यात भर म्हणजे भोसले मिलिटरी स्कूलची आलेली ट्रीप. माकडांना बघून या मुलांच्या माकड चाळ्यांना अगदी बहर आला होता.

अष्टविनायक यात्रेत एक अशी प्रथा आहे की पहिल्या गणपती दर्शनाच्या वेळी नारळ घ्यायचा तो नारळ ते गणेश चरणाला लावून तुम्हांला परत देतात. तोच नारळ आठी गणपतीच्या वेळी ते गुरुजी त्याच पद्धतीने तुम्हांला परत देत असतात. हा आमचा सातवा गणपती होता.. नारळाची पिशवी यांच्याकडे होती. एका माकडाने झडप घालून ती पिशवी काढून घेतली. सगळ्यांचा आरडाओरडा सुरू झाला. मला काय झाले कळले नाही पण अगदी शेवट आलाय आणि हे माकड माझा प्रसाद काढून घेतेय हे बघून मी रागात भरकन पुढे जाऊन त्याच्या हातातील पिशवी ओढून घेतली. पिशवी फाटली पण माझा प्रसाद सुखरूप माझ्यापर्यंत पोहचला. शाळेच्या मुलांनी आणि सगळ्यांनी जोर जोरात टाळ्या वाजवल्या.

हा एकूणच माकडा बरोबरचा प्रवास आठवला तर वाटते काय काय बरं माझ्या पत्रिकेत योग असतील..?



सौ.माधुरी म.इनामदार
मिरज


# मुंबई उपनगर ग्रंथोत्सवाचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते १२ फेब्रुवारीला उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – मुंबई उपनगर ग्रंथोत्सव २०२४ चे पालकमंत्री तथा माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड्. आशिष शेलार यांच्या हस्ते १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मुलुंड पश्चिम येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील तर प्रमुख उपस्थिती कौशल्य विकास मंत्री तथा मुंबई उपनगरचे सह–पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांची असणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी मुंबई उपनगर, समन्वय समिती व जिल्ह्यातील सर्व शासन मान्य ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने १२ व १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत ग्रंथदिडी, ग्रंथप्रदर्शन, ग्रंथ विक्री व विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. दि. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ग्रंथदिंडीचा कार्यक्रम ९ ते १०.३० या वेळेत आहे.ग्रंथदिंडीचे उद्धघाटन आमदार मिहिर कोटेचा यांच्या हस्ते व मुंबई उपनगरचे जिल्हा नियोजन अधिकारी संजय कुमार शिंदे, मुंबई महापालिकेचे शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ,प्रशासकीय अधिकारी, टी वॉर्ड, कैलास चंद्र आर्य, सहायक डॉ.विजयकुमार जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

# ९ फेब्रुवारीचा दिवस अविस्मरणीय...



जुना "बामणाचा पत्रा"



**ज्योतिर्मय साहित्य**

कालचा रविवारचा दिवस माझ्यासाठी खूप अविस्मरणीय, आनंददायी, आणि प्रेरणादायी ठरला. कारण होते विटा येथील ४३वे ग्रामीण साहित्य संमेलन, या संमेलनात विविध मान्यवर साहित्यिकांची भेट झाली. आमचे झरे गावचे व्याही प्रा.साहेबराव चवरे तथा आप्पा यांच्या बरोबर साहित्यिक मंडळींना भेटता बोलता आलं.ओळखी झाल्या.

आमच्या सोलापूरच्या काही साहित्यिक मंडळीची ही भेट झाली. प्रा.मुकुंद वलेकर, गोविंद काळे, कादंबरीकार मुरहरि केळे यांच्या भेटी झाल्या. गोविंद काळे यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या वरील काव्य सादरीकरणामुळे मी ही अहिल्यादेवी यांची कविता सादर केली, आणि बालकांसाठी बालकाव्य सादर केले.



दत्ता तरलगट्टी

यानंतर आटपाडीकडे येताना सहज मी आप्पांना म्हणले हा माणदेश प्रदेश आहे. तर आण्णा तथा ''महाराष्ट्र वाल्मिकी'' यांचे गाव या भागातच असेल ना? तर लगेच त्यांनी आठ दहा कि.मी. वर असणाऱ्या माडगुळे या आण्णांच्या गावी नेले. ''बामनाचा पत्रा'' अशी ओळख असलेल्या त्यांच्या उंबर्याला स्पर्श करूनच आत पाऊल ठेवले.....आणि मी धन्य झालो. वाटले आज माणदेशी आपली दोन काव्यपुष्पे आण्णांच्या चरणीं समर्पित केली आहेत. खरचं माझ्या सारख्या नवसाहित्यीकास ह्या संस्मरणीय स्थळांची भेट म्हणजे अविस्मरणीय असा अनुभव होता. ''आज माझी लेखणी प्रयागराज मध्ये न्हाल्याची भावना मनोमन होत आहे.'' आमच्या सोबत आप्पांचे मित्र व गदिमांच्या शाळेत सेवा केलेले सेवानिवृत्त मुख्याध्यापक वाय डी तथा यशवंतराव सरक सर होते. ही मंडळी नेहमीच वाड्यावर साहित्यिक गेटटुगेदर करतात ही माहिती त्यांनी दिली.तसेच आणखीन एका ख्यातनाम साहित्यिकाचे म्हणजे शंकरराव खरात यांचे ही घर लांबून पाहता आले.खरचं आजचा दिवस माझ्यासाठी कुंभमेळ्या पेक्षा कमी नव्हता..!!!

# बाल साहित्य विश्वातील नवे प्रयोग म्हणजेच ''अक्षर अक्षर शिकूया''

**ज्योतिर्मय साहित्य**


बालमन हे भन्नाट कल्पनांनी भरलेलं असतं मुलांच्या मनात सतत नवीन काहीतरी करण्याची इच्छा असते. एकच एक गोष्ट करून ते कंटाळतात. त्यांना नवीन काहीतरी हवं असतं. मुलांना काहीतरी नवीन वाचनासाठी द्यावं जे त्यांना आवडेल. हा हेतू पूर्ण करण्यासाठी मलेकाजींनी या बालकाव्यसंग्रहाची निर्मिती केली आहे.

बाल काव्यसंग्रह लिहिणे म्हणजे तारेवरची कसरतच आहे कारण मुलांना भावेल, त्यांना सहज म्हणता येईल, गुणगुणता येईल अशा सहज सोप्या शब्दात तसेच मुलांच्या भाव विश्वाला आणि कल्पनेला लक्षात घेऊन एक एक कविता साकारावी लागते. आपले तीन काव्यसंग्रह ''मानसमेघ, अमन, आयाम'' व एक चारोळीसंग्रह ''उमेद'' च्या प्रकाशनानंतर कवयित्री मलेका शेख–सय्यद यांनी ''अक्षर अक्षर शिकूया'' हे बाल काव्यसंग्रह लिहिला आहे. काव्यसंग्रह इतकं सुंदर आहे कि पाहताच वाचण्याचा मोह आवरला नाही.मनातील एक लहान बालक पुन्हा जागा झाला व मी माझ्या लहानपणात रमून गेलो असे वाटले कारण संपूर्ण काव्यसंग्रहात ए.आय. या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक कवितेला साजेल असे चित्र प्रकाशकाने साकारले आहे.

काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ ज्योती घनश्याम यांनी तंत्रज्ञानाचा वापर करून रेखाटले आहे. मुखपृष्टाला शाळेतील वर्गाचे चित्र रेखाटले आहे जो कि काव्यसंग्रहाला शोभून दिसतो. कवयित्री मलेका शेख–सय्यद यांनी आपला काव्यसंग्रह भावंडांना व मुलांना समर्पित केला आहे. या काव्यसंग्रहास लाडोबा प्रकाशनाचे प्रकाशक घनश्याम पाटील यांनी प्रस्तावना दिली आहे तर पाठराखण साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार प्राप्त कवी. एकनाथ आव्हाड यांनी केली आहे. कवयित्री. मलेका शेख–सय्यद या शिक्षिका असल्यामुळे त्यांचे भोवताल मुलांच्या भावभावनेने व्यापले आहे. त्यामुळे मुलांच्या कल्पनांचा विचार करणे आणि काव्यात उतरवणे

या काव्यसंग्रहात मुलांमध्ये संस्कार बीज मलेकाजी सहज पेरतात कोणताही व कसलाही प्रबोधनाचा आव न आणता. त्यांनी मुलांना अनेक चांगल्या सवयी या काव्यसंग्रहात सांगितल्या आहेत. या काव्यसंग्रहात पर्यावरणाविषयी जागृती केली आहे, डोंगरांचं, झाडांचं महत्व सांगितलं आहे, त्याचबरोबर खेळाचे महत्त्व पटवून दिले आहे.

काव्यसंग्रहातील पहिलीच कविता अक्षर अक्षर शिकूया त्यामधील पुढील ओळी मुलांवर संस्कार करताच सोबत वाचनाची आवड निर्माण करताना सावित्रीमाई व जिजाऊ यांनी आठवण ही करून देताना कवयित्री पुढील ओळी लिहितात





''पुस्तक आपले आहे सोबती
शिकता शिकता सर्व बोलती
सावित्री, जिजाऊ आदर्श नारी
पुस्तके वाचूया भारी भारी''

त्याचबरोबर झाडे लावू ही कविता झाडांचा, डोंगरांचा, नदीचा, स्वच्छतेचा महत्व सांगते व निसर्गा प्रती कृतज्ञतेची भावना ही निर्माण करते. मैत्री ही कविता पडणाऱ्या पावसाच्या पाण्यात कागदाची होडी बनवून लहान मुलं जे खेळ खेळातात त्या खेळाची आठवण करून देताना मलेकाजी पुढील ओळी लिहितात

''तू धर छत्री
मी बनवतो होडी
मग जाऊ पाण्यात
मजा येईल थोडी''

लहान मुलांना बाबापेक्षा आईची सोबत जास्त असते मुलं शाळेतून घरी आले कि त्यांना पडणारे सर्व प्रश्न आईला विचारत असतात आणि आई सर्व प्रश्नांची उत्तरे न थकता देत असते.आईचा मुलांचा संवाद काव्यमय पद्धतीत मलेकाजी आपल्या या काव्यसंग्रहात मांडतात.मुले जे काही शाळेत शिकतात त्याचा अवलंब ते घरी आले कि करतात तसंच काही ''कचरा'' या कवितेत अगदी सुंदर रित्या मलेकाजी यांनी रेखाटलं आहे.

''आई आई नको टाकू
कचरा इकडे तिकडे
शाळेत सांगतात बाई
लक्ष द्या स्वच्छते कडे''

शिकूया मुलांनो, ढगोबा, चांदोमामाची नगरीं, मुंगीताई, देवबाप्पा या कवितेतून मुलांना शिक्षणासोबत आनंदही मिळावा असा अतोनात प्रयत्न मलेकाजी आपल्या कवितेतून करताना दिसतात. मलेकाजी तिरंगा या देशभक्तीपर गीताद्वारे मुलांना तिरंग्याचे महत्व व तिरंगाच्या रंगाचे, अशोकचक्राचे महत्व सांगतात त्याचं बरोबर मुलांच्या मनात देशभक्ती अंकुरीत करण्याचा प्रयत्न करताना खालील ओळी लिहितात

''प्रिय आमचा झेंडा तिरंगा फडकत राहो नभात
मायभूचे प्रेम राहिलं सदैव आमच्या हृदयात ''

मुलांचा शाळेच्या डब्याबद्दल आई सोबत होणारा नाजूकसा गोड असा सवांद,मुलांना आवडणारी मनीमाऊ, मासा, पतंग, फास्ट फूड, मोर, पोपट, आगगाडी, फुलपाखरू, परी अशा सुंदर सुंदर कवितांचा या काव्यसंग्रहात मलेकाजी यांनी समावेश केला आहेच सोबत मायभूमीच्या संस्कृतीतून लोप पावत जाणाऱ्या ''पोळा'' या ग्रामीण संस्कृतीचा वसा मुलांना समजावून सांगताना खालील ओळी मलेकाजी रचतात

''वाजत गाजत मिरवणूक ओवाळते माला
वर्षभर काम काम आज आराम ह्याला
गोड गोड पुरणपोळी खाऊ घालू त्याला
चिऊ माऊ चला गं चला लागू कामाला ''

मलेकाजी यांनी भातुकली, हसू खेळू, मोबाईल या कवितेत आजच्या पिढीच्या मुलांना मैदानी खेळ महत्वाचे आहेत ते खेळले पाहिजे,मोबाईलचा वापर जास्त करू नये हे आपल्या काव्यातून समजावतात. शहर, शिकारी, प्राण्यांची सभा, घड्याळ दादा या कवितेतून काव्यरूपी कथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पालक, रोज रोज व फास्ट फूड या कवितेत भाजी, फळे हे आरोग्यासाठी किती महत्वाचे हे सांगताना मलेकाजी खालील ओळी लिहितात

''गाजर काकडी टोमॅटो
फळे खा रोज थोडे
त्यातून सुटेल शरीराचे
बाई म्हणतात कोडे''

शेवटची कविता खोटं ही लहान मुलांच्या भावना व्यक्त करणारी आहे व ती प्रौढ व्यक्तींना विचार करायला लावणारी आहे. आपण मुलांना जे काही सांगतो, समजावतो खरंच आपण तसे वागतो का? आपल्या वागण्यावरून व सवयीवरून मुलांना काय प्रश्न पडतात त्यांच्या मनात काय चालू असते, ते काय विचार करतात, देवबाप्पाला गाऱ्हाणे मुलं कसं मांडतात मलेकाजी यांनी अतिशय सुंदर रित्या याचा उल्लेख केला आहे.

''देवबाप्पा देवबाप्पा
खरं सांगू तुला
माणसं बोलतात खोटी
राग येतो मला''

या बाल काव्यसंग्रहात विविध काव्यप्रकारातील एकूण ४५ कविता व त्याला अनुसरून उत्तम चित्र त्यामुळे या काव्यसंग्रहाचा दर्जा अजूनच उंचावतो. हा काव्यसंग्रह मुलांना व मोठ्या वाचकांना आवडेल यात काही शंकाच नाही.कवयित्री मलेका शेख–सय्यद यांच्या हातून अशीच वेगळी लेखन क्रांती घडो अशी इच्छा व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा..

बालकाव्य संग्रह
बालतरंग –कवयित्री.मलेका महेबूब शेख –सय्यद
प्रकाशक – घनश्याम पाटील
प्रकाशन –लाडोबा प्रकाशन
प्रथम आवृत्ती –१२ जानेवारी २०२५
मूल्य –१५०/–फक्त



# आम्ही अन् आमचा बाप..

**ज्योतिर्मय साहित्य**

आईचा गोडवा नेहमीच गायला जातो
तशी ती जगात आहेच लय भारी..
माझा बां पण तेवढाच तोडीचा आहे
कारण तो जगापेक्षा हाय लय न्यारी..

बाप नावाच चरित्र तसं पहिल्यापासूनच सगळ्यांकडून दुर्लक्षित राहिलेलं आणि कमी कौतुक असणारं. तरी अलीकडच्या काळातील लेखक आणि कवी बाप या विषयावरच काही लिहायला लागले आहेत. लेखकांचेच काय पण घरातही बापापेक्षा नेहमी आईलाच वरचढ मोल असतं. इथे मी आई आणि बाप यांची तुलना करत नाही पण काही केले तरी आईचच पारड जड असतं आणि त्यामुळे बाप नेहमीच कौतुकापासून वंचित राहतो.पण बापासारखं काळीज फक्त बापाचचं असतं हे विसरून चालणार नाही आणि त्याची जागाही कोणी घेऊ शकत नाही. स्वतः दिव्याच्या वातीप्रमाणे जळून कुंटुंबाला प्रकाशित करणारी आई सगळ्यांनाच दिसते पण त्याच वातेला जळण्यासाठी जे तेलाचं आर्थिक पाठबळ लागतं ते आर्थिक पाठबळ उभं करण्याचं काम हा बाप करत असतो. पणतीचा प्रकाश आणि वात सगळ्यांना दिसते पण त्याच पणतीत असणाऱ्या तेलाकडे कुणाचं लक्ष जात नाही.तसच काही बाप नावाचं व्यक्तिमत्व साईड हिरो म्हणून दुर्लक्षित राहतो.

माझे वडील शहाजी विष्णू कदम मूळचे कोरेगाव तालुक्यातील अपशिंगे या गावचे पण सध्या रहिमतपूर मध्येच स्थायिक झाले आहेत. माझे वडील भारतीय सैन्य दलात २४ वर्ष कार्यरत होते. म्हणजेच फक्त कुटुंबासाठी नाही तर देशासाठी झिजणारा असा माझा बाप आहे हे मला अभिमानाने सांगावं वाटतं. विशेष अभिमानाने सांगायची गोष्ट म्हणजे माझे वडील कारगिल युद्धात ही सामील होते. त्यामुळे ते देशाच्या विजयपर्वाचे साक्षीदार होते आणि देशाच्या त्या गौरवशाली पराक्रमात सहभागी सुद्धा होते या भावनेने छाती गौरवाने भरून येते. माझे आजोबा पण सैन्यदलात होते त्याच्यामुळे त्यांचे स्वप्न होतं की माझ्या चार मुलांपैकी एकतरी मुलगा सैन्यदलात असावा.आणि वडिलांचे हेच स्वप्न मनी बाळगून माझ्या वडिलांनी सेनादलात भरती होण्याचं ठरवलं. पुण्यात माझे आजोबा आणि मोठे चुलते दादा स्वतःच्या हातांनी जेवण करून घालायचे. अशा या हलाखीच्या काळात १० वी पास झाले की लगेच सेनेत भरती झाले.१९८० ला भरती झालेल्या माझ्या वडिलांना त्यावेळी फक्त १७५ रुपये पगार होता. त्याकाळी एक एक वर्षानेच सुट्टी मिळायची. पण कधीही संयम ढळू दिला नाही. देशसेवेचे व्रत घेतलेल्याना कुटुंबाची चिंता नसते ते बरोबरच आहे.सैन्यदलात असल्यामुळे पहिल्यापासूनच रुबाबदार आणि शिस्तप्रिय असे हे त्यांचे व्यक्तिमत्व आहे.घरात आणि वागण्यात नेहमीच त्यांना टापटीपपणा हवा असतो.शिस्तीच्या बाहेर काही गैरवर्तन केले तर आम्हाला शिक्षाही तशीच मिळायची. पण या शिस्तीचाच आम्हाला भविष्यात खूप सारा फायदा झाला. कष्टाची सवय असलेला माझा बाप निवृत्त झाल्यावर घरी बसेल तो हाडामासाचा फौजी कसला.. आजही वयाच्या ६२ व्या वर्षी तेवढ्याच ताकदीने शेती करत आहेत. व त्याबरोबरच विठुरायाच्या नादात तल्लीन होऊन मुखी राम कृष्ण हरी चा गजर चालू असतो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ‘‘काया ही पंढरी, आत्मा पांडुरंग‘‘ या वचनानेच आम्हालाही आई-वडिलांमध्ये विठ्ठल रखुमाई बघण्याचे संस्कार लाभले आहेत. विठ्ठल रखुमाईचे तर मला काय माहित नाही पण अठ्ठावीस युगे उभे विटेवरी पांडुरंग जसा भक्त पुंडलिकासाठी आहे तसेच माझे आई-वडील नेहमीच माझ्या पाठीशी उभे असतात. त्यामुळे जन्मापासून आजपर्यंत कधीच माझ्या डोक्यावर चिंतेचा भार आलेला नाही.



ज्याप्रमाणे ऊन, वारा, पाऊस काहीही असेल तरी छतावरचा पत्रा आपलं संरक्षण करतो. पण मुसळधार पावसात त्याच पत्र्याचा आवाज जास्त यायला लागला की लोक त्याला शिव्या घालतात. अगदी तसचं काही बापाच्या बाबतीतही घडत असतं परिस्थिती कोणतीही असो, आपला बाप आपल्या घराची काळजी घेत असतो पण कधी ओरडला, बोलला तर त्याला दोष दिला जातो. पण त्यामागची भावना समजून घ्यायचा प्रयत्न कोणी करत नाही. माझ्या वडिलांचा स्वभाव कडक आणि शिस्तप्रिय असला तरी ते नारळाप्रमाणे आहेत. बाहेरून कठीण पण आतून तितकेच प्रेमळ स्वभावाचे आहेत. घरी यायला उशीर झाला तरी नेहमी चौकशी करतात. आजही मी कमवतो झालो तरी कधी पैशाची कमी वाटली तर स्वतः देतात. मला आठवतय, माझं इंजिनिअरिंग पूर्ण झालं आणि मी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करायला सुरुवात केली. घरात पैशाची चणचण व्हायला सुरू व्हायला लागली पण वडिलांनी कधी करू नको असं म्हणलं नाही उलट नेहमीच पाठबळ देत राहिले. सैन्य दलात असताना मुलांना ट्रेनिंग देताना हातात गोळ्या घुसल्या आहेत व पायाची वाटी सरकली होती. त्यामुळे शरीराला त्रास नेहमी व्हायचा.पण जो मुलांच्या भविष्यासाठी थकेल तो बाप कसला? स्वतःचं दुखणं कधी न सांगता कायम आम्हा भावंडांसाठी रक्ताचं पाणी करून राहिला. पण कधी तक्रार नाही केली. सेनादलातून निवृत्त झाल्यानंतरही विविध ठिकाणी नोकरी केली. त्यांचं म्हणणं असायचं जोपर्यंत माझा मोठा लेक नोकरी लागत नाही तोपर्यंत नोकरी सोडणार नाही. रहिमतपूर वरून सातारला रोज येऊन जाऊन करायचे. कितीही पावसाळा असो, कितीही थंडी असो पण माझा बा कधी थांबला नाही. त्यांना मुळात थांबणे कधी जुळलेच नाही. जसं वटवृक्षाचे झाड कितीही वादळ, वारा, पाऊस आला तरी थाटात उभं असतं. तसेच काही माझे वडील घरावर कोणताही प्रसंग येवो, कायम कुटुंबासाठी उभे आहेत आणि त्यांना साथ देणारी आमची रखुमाई सारखी माऊली तेवढ्याच ताकदीने त्यांच्या पाठीशी आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना कित्येक आजूबाजूची माणसं नाव ठेवायची की, बस झाला आता किती दिवस बापाच्या जीवावर जगणार..? मला खूप वाईट वाटायचं, माझा आत्मविश्वास ढळायचा पण माझे वडील मला म्हणायचे, ‘‘नोकरीला नाही लागला तरी चालेल आयुष्यभर तुला सांभाळीन, पण खचू नकोस, वाईट विचार कधी मनात आणू नकोस. तुझा बाप अजून खंबीर आहे. असं आभाळ एवढं पाठबळ दिल्यावर माझ्या अंगी हजारो हत्तींचे बळ यायचं. अन् पुन्हा तेवढ्याच उर्जेने अभ्यासाला लागायचो. बाप नावाचा आधारवड ज्याच्या सोबत असतो त्याला आयुष्यात कधीच काही कमी पडत नाही.. आपल्या बापाने आपल्या खांद्यावर नुसता हात जरी ठेवला तर जगातल्या कोणत्याही संकटांना भिडण्याची ताकद आपोआपच येते..

आयुष्याच्या चित्रपटात बाप नावाचं कॅरेक्टर नेहमीच पडद्यामागचा कलाकार म्हणून पडद्याआडच राहतो. पण बाप नावाच कॅरेक्टर नसेल तर तो चित्रपटचं होणार नाही हेही तितकंच लक्षात ठेवलं पाहिजे. आभाळाएवढी माया करणारी आई असली तरी आपल्यासाठी आभाळाएवढी स्वप्न बघणारा आपला बाप असतो. अन ती स्वप्न पूर्ण करण्यासाठी आयुष्यभर स्वतःची हाड झिजवणारा पण बापच असतो. कुटुंबाची स्वप्न पुरी करता करता बाप स्वतः ची स्वप्न जगायचां राहूनच जातो. हे आपण विसरता कामा नये. म्हणून शेवटी एवढेच सांगतो..

पोराच्या जन्माच्या कळा
आई सोसत असते..
पण त्याच माय लेकराला सुखरूप बघण्यासाठी
ज्याच्या काळजाचं पाणी व्हतं तो बाप असतो..
पोरासाठी आईचं काळीज जळत असतं..
पण तेच पोरगं बापाचं काळीज असतं..
हीच काळजातील गोष्ट समजायला,
पोराला बाप व्हावं लागतं..



विजय उषा शहाजी कदम
रहिमतपूर, सातारा
मो.९८९०५१६१०१

# तुम्ही जसे विचार करता तसे बनता


**ज्योतिर्मय साहित्य**

माणसाला मिळालेले मोठे वरदान म्हणजे मेंदू. माणसाचा मेंदू जसा विचार करतो तसा माणूस बनतो. म्हणजेच माणूस जसा विचार करतो तसे त्याचे वर्तन आणि कृती घडते. सकारात्मक विचार केली तर त्याच्या हातून चांगली कृती घडण्याची शक्यता असते.परंतु नकारात्मक विचार चांगली कृती किंवा चांगले कार्य घडण्यापासून तुम्हाला दूर ठेवतो.

आपल्या आजूबाजूला अशीही काही माणसे असतात. जी नेहमी शंका कुशंका उपस्थित करतात.त्यांच्या मनात पहिल्यांदा नकारात्मक विचार येतो.सतत अशा नकारात्मक विचारांची मनाला सवय लागते. त्यांचे मन शंकेखोर बनते. त्यातून त्यांची विचारांची दिशा नेहमी नकारात्मक बनते. कोणत्याही कामाला सुरूवात करण्यापूर्वी नकार घंटा वाजविणे अशा लोकांचा स्वभाव बनतो.सतत नकारात्मक विचारांची सवय लागल्याने असे लोक आपल्या आजूबाजूला निगेव्टिव्ह एनर्जी पसरवत असतात.त्यांच्या सहवासात आणि संपर्कात येणाऱ्या लोकांना सुद्धा नकारात्मक विचारांची सवय लागते.

माणसाने नेहमी सकारात्मक विचार करावा.अशा सकारात्मक विचारांनी संपूर्ण शरीरात आनंद लहरी निर्माण होतात. तुम्हाला सकारात्मक ऊर्जा मिळते.तुमचा आत्मविश्वास कमालीचा वाढतो.तुमचे मन प्रसन्न आणि आनंदी होते. हाती घेतलेल्या कामात यश मिळण्याची खात्री वाढते.मनापासून प्रयत्न केले की यश मिळतेच.

सुप्रसिद्ध लेखिका सुधा मूर्ती टेल्को मधील नोकरी सोडताना जेआरडीना भेटल्या आणि म्हणाल्या ‘‘ माझा नवरा स्वतंत्र उद्योग सुरू करीत आहे.मी नोकरी सोडून जात आहे.यशस्वी होऊ की नाही हे सांगता येत नाही ‘‘ तेव्हा जेआरडी त्यांना म्हणाले‘‘ अशा नकारात्मक भावनेने सुरूवात करु नका. यश मिळेल असा विश्वास सुरुवातीला वाटायला हवा ‘‘



**विद्यार्थ्यांशी हितगुज**
**लक्ष्मण जगताप, बारामती**
**संपर्क : ९४२३२ ४९९९६**

यातून आपल्या लक्षात येते की आपण ज्यावेळी नवीन काही सुरू करण्याचे किंवा कोणतेही काम करण्याचे मनात ठरवतो त्यावेळी आपल्या मनात नकारात्मक भावना असता कामा नये.

तुम्ही नकारात्मक विचार करत असाल तर तुम्ही तसेच बनता.आणि अपयशी ठरता. मग आपण इतरांना दोष देत असतो. खरं तर आपलं यशस्वी होणे हे दुस-यांवर अवलंबून नसते तर आपल्या विचारात असते.

त्याकरीत आपले विचार हे नेहमी सकारात्मक असावेत.विचार संकुचित आणि स्वार्थी असतील तर नियती आपल्याला यशापासून दूर ठेवते. आपले विचार हे पाण्यासारखे स्वच्छ, निर्मळ असावेत. संकुचित विचारांनी हाती घेतलेले कार्य असफल होते. मन मोठे असेल तर विचारही तितकेच विशाल आणि परिपक्व असतात. कधीकधी माणसाचे वय वाढलेले असते परंतु विचारांची उंची लहान झालेली असते. अशी माणसे स्वतः पुरता विचार करतात. इतरांचे त्यांना काही देणे घेणे नसते.

माणसाने सकारात्मक विचारांची पेरणी केली तरच मनात आनंद आणि प्रसन्नतेचे पीक जोमाने उगवेल ज्याने आयुष्य समाधानी होईल.






## पानगळीच्या पानांतूनही दरवळे...

मंद सुगंधी निश्वास !
अर्ध्यातच गळल्या पानांना होती..,
पूर्ण जीवन जगण्याची आस !

तरीही परिपूर्ण शुष्क पानांतही होता....
जीवन कृतार्थतेचा वास !
अन् जन्मदात्या वृक्षाखालीच सोडला,....
त्यांनी अंतिम निश्वास !!!

सरमिसळ यशस्वी, अयशस्वी जीवनांची...
सर्वांनाच मातीत मिसळण्याची आस !
मरणोत्तरही वावटळ पळविते...
जीवनात ना देखिलेल्या प्रदेशास !

कशी म्हणावी, त्यांस मृत जीवनांची कलेवरे...
काय म्हणावे त्या जीवांस ?!
काही माणसंही तर अशीच जगलेली...
कळते, कुणाची पावले चिरडता निर्माल्यास !!!

नवीन पालवी फुटलेल्या फांदीला...
तरीही येतेच विगत पानांची याद !
म्हणे इथंही सानुलं गुलाबी अर्भक पान होतं
खूप सळसळून वयाआधीच झाले वयबाद !

हळूहळू फांदीतीलही जीवनरस आटला....
कळेना त्यास, काय घडला असावा प्रमाद !
कण नि मातीशी एकरूप झाला नि ऐकू ये....
पुनश्च नवजीवनाची साद !!!
विठू चरणीं

**– मदन नथु महाजन**




## तुझ्यावर

नाही केली कधी बघ
मी कविता तुझ्यावर
भिती होती मनामध्ये
नाही राग तुझ्यावर...

झाड देखील रुसते
वाळलेल्या पानांवर
ती पाने जपशील तू
हा विश्वास तुझ्यावर...

प्रेम तुझे आभाळाशी
घेतेस मिठीत त्याला
भलतेच प्रेम आहे
आभाळाचे तुझ्यावर...

चंद्र चोरला आहेस
रात्रीच्या कथांमधला
रात्री कित्येक चांदण्या
जळतात तुझ्यावर...

**– महेश जायभाये,**
**बोरगाव (खु.)**
८०८०८५४१३७

## नवे झाड लावू

तुम्ही बीज दिधले नवे झाड लावू
तजेला हवेला पुन्हा आज देऊ

झरा प्रेमरूपी इथे वाहताहे
जुने कोंब त्याला नव्यानेच आणू

कुणाला रुचावा जुना मंत्र आता
धनापाठ जो तो उगा लागे धावू

तिला पाहिले मी घराच्या कडेला
दुरावा तरी मी कसा आज साहू

वडा पार नाही परि वृध्द तेथे
जुनी रीत पाहे नव्यानेच जागू

**प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**
ताळगाव, गोवा

## म्हणूनी आई असते आई

म्हणूनी आई असते आई!
तिच्या प्रेमाची न होते उतराई
तिच्या प्रेमाला जगी तोड नाही
सर्वांगी माया ओथंबूनी राही
म्हणूनी आई असते ....

आई आहे सा-या विश्वाचे दैवत
सर्व करिती नयन तिज माथा टेकीत
आई असते सदैव सुखाची सावली
निर्धास्त असतात घरातील सगळी
म्हणूनी आई असते .....

घेतला अवतार धरेवर, कृष्ण भगवंताने
देवकी आईच्या संचिताने तिच्या पोटी
सुखविले अवघ्या सृष्टीला भगवंताने
तृप्त झाल्या देवकीआई नि यशोदामाई
म्हणूनी आई असते ......

काव्यरचना: मधुकर ए. निलेगावकर,
पुणे, ९४२१३७५६९१






हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559